# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


**परिपत्रक**

क्रमांक : १०/एनजीपी/उन्हाळी सुट्टी/२०१०/ 934

दिनांक : 30 APR 2010

विषय : उन्हाळी सुट्टी : शैक्षणिक वर्ष २०१०-११

सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित व विनाअनुदान तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर पदविका ( स्वायत्त तंत्रनिकेतनांव्यतिरिक्त इतर ) संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये ४० दिवस उन्हाळी सुट्टी व २० दिवस हिवाळी सुट्टी देण्यात येते.

त्या अनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, त्यांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने नेमून दिलेल्या सत्राचा कालावधी लक्षात घेवून शैक्षणिक परीक्षा व उत्तर पत्रिका मूल्यमापनाच्या कामासाठी लागणारा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग थोपवून **दिनांक १०.५.२०१० ते १८.६.२०१० पर्यंत ४० दिवस उन्हाळी सुट्टी** देण्यात यावी.

तसेच परीक्षा उत्तर पत्रिका मूल्यमापनाच्या कामासाठी ज्या कर्मचाऱ्यांना थांबविण्यात येईल, ते परीक्षेची कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यांना पुढे असेही कळविण्यात येते की, संबंधीत कर्मचारी वर्गाकडून परीक्षेच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा कामचुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, हेही संबंधीत कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता दिलेली आहे, त्या संस्थांमध्ये सत्र अभ्यासक्रम राबविले जातात. तेव्हा त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या कालावधीचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षेच्या कामासाठी लागणारा कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोईनुसार सुट्टी देण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापी, सदर सुट्टी ६ आठवडयांपेक्षा (४० दिवसांपेक्षा) जास्त असू नये.

( श्रीमती ए.सी. अत्तार )
प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी,
तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

प्रत, प्राचार्य, शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर तत्सम पदविका संस्था ( **संबंधीत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांचेमार्फत** )

प्रत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. सचिव, महाराष्ट्र राज्य,तंत्रशिक्षण मंडळ, ४९, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, बांद्रा (पू.), मुंबई ५१
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे/ औरंगाबाद/ नागपूर
४. कार्यासन क्रमांक २, २अ, ४, ४अ, ७ व १२, मुख्य कार्यालय, मुंबई